# मुंबई विद्यापीठ

तात्काळ/अति महत्वाचे

क्र.वि.नि.वि.वि/४३२/१९/२०१६,
मुंबई – ४०० ०३२,
२५ फेब्रुवारी, २०१६,

परिपत्रक :–

विषय:– दि. २७ फेब्रुवारी २०१६ रोजी मराठी राजभाषा दिन साजरा करणेबाबत

संदर्भ :–विद्यापीठ विभागाचे परिपत्रक
१) क्र. वि.नि.वि.वि./४३२/२२/दि. ३ फेब्रुवारी २०१५
२) क्र. वि.वि.भ./४२/दि. ९ फेब्रुवारी २०१५
३) क्र. वि.वि.भ./५१/दि. २५ फेब्रुवारी २०१५
४) क्र. वि.नि.वि.वि./४३२/३/दि. १० जुलै २०१५

महोदय/महोदया,

वरील संदर्भिय परिपत्रकांन्वये आपणांस महाराष्ट्र शासन व मा. कुलगुरूंच्या आदेशानुसार असे सुचित करण्यात आले होते की, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या प्रत्येक महाविद्यालयात व विद्यापीठ विभागांमध्ये मराठी राजभाषा दिन साजरा करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. त्यासाठी संलग्नित महाविद्यालयांनी तसेच विद्यापीठाच्या विविध विभागामध्ये/संस्थामध्ये आपापल्या अर्थसंकल्पात आवश्यक ती आर्थिक तरतुद करावी व या दिनासाठी आपल्या संस्थेत सदर कार्यक्रम साजरा करण्याची रूपरेषा कशी तयारी केली आहे अथवा करण्यात येत आहे त्याबाबतची माहिती सादर करावी असेहि कळविण्यात आले होते.

तरी आपणांस असे सुचित करण्यात येत आहे की, आपल्या महाविद्यालयातील वाड:मय मंडळातर्फे "मराठी राजभाषा दिन" दि. २७ फेब्रुवारी २०१६ रोजी विविध उपक्रमांनी साजरा करावा तसेच दि. २८ फेब्रुवारी हा दिवस विज्ञान दिवस म्हणून साजरा केला जावा व हया दिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करावे. सदर कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे स्वतंत्र अहवाल विद्यापीठास सहाय्यक कुलसचिव विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग मुंबई – ४०० ०३२ येथे सादर करावा.

मुंबई – ४०० ०३२
दि. २५ फेब्रुवारी, २०१६,

(डॉ. अनिल पाटील)
संचालक, बि.सि.यु.डी.
(मुंबई विद्यापीठ)

प्रत रवाना:– प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, संचालक/विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, यांच्या माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

उपकुलसचिव, (जनसंर्पक अधिकारी), मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२, यांच्या माहितीकरिता प्रत रवाना